**महत्वाचे**

**मध्यवर्ती भांडार कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
जा .क्र.- 9292
दिनांक - 26/10/2020

# कार्यालय परिपत्रक

**विषय** :- सन २०२१-२०२२ करिता स्टेशनरी, आरोग्य व हार्डवेअर इ. विभागासंबंधित साहित्याची वार्षिक मागणी पाठविणे बाबत.

पुणे मनपाच्या मध्यवर्ती भांडार कार्यालयाकडील स्टेशनरी, आरोग्य व हार्डवेअर इ. विभागामार्फत विविध खात्यांना अनेक प्रकारचे साहित्य पुरवले जाते. सन २०२१-२०२२ करिता विविध खात्यांना आवश्यक साहित्य खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्याकरिता सर्व खात्यांना कळविण्यात येते कि, सन २०२१-२२ करिता स्टेशनरी आरोग्य व हार्डवेअर इत्यादी विभागासंबंधित साहित्याची वार्षिक मागणी प्राप्ती व चाचणीचे अंतर्गत अर्थन्विक्षक यांची मान्यता घेऊन मध्यवर्ती भांडार कार्यालयाकडे पाठवावी. प्राप्ती व चाचणीचे अंतर्गत अर्थन्विक्षक यांची मान्यता न घेतलेल्या वस्तूंची मागणी पाठवू नये. अशा मागणीचा विचार मध्यवर्ती विभागाकडून केला जाणार नाही. आपल्या विभागाने पाठविलेल्या मागणीच्या आधारे सदर मालाची खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने वार्षिक मागणी पाठविताना स्टेशनरी, आरोग्य व हार्डवेअर या विभागासंबधीत साहित्याची एकूण वार्षिक मागणी एकदाच पाठवावी. वार्षिक मागणीपत्रक सोबत असणे अनिवार्य आहे.

तसेच सन २०२१ चे मनपा कॅलेंडर, डायरी व प्लॅनरची स्वतंत्र मागणी मध्यवर्ती भांडार कार्यालयाकडील स्टेशनरी विभागाकडे दि. ३०/११/२०२० पर्यंत पाठविण्यात यावी.

तरी सर्व खात्यांनी सोबत पाठविलेल्या मागणी पत्रकातील प्राप्ती व चाचणीचे अंतर्गत अर्थन्विक्षक यांनी मान्य केलेली वस्तूंची मागणी पत्रके ( स्टेशनरी, आरोग्य व हार्डवेअर इ. विभागासंबंधी ) दिनांक ३१/१२/२०२० पूर्वी मध्यवर्ती भांडार कार्यालयाकडे पाठवावी. तसेच प्राप्ती व चाचणीचे अंतर्गत अर्थन्विक्षक यांनी मान्य केलेली मागणी पत्रकाची झेरॉक्स प्रत मध्यवर्ती भांडार कार्यलयाकडील संबंधित स्टेशनरी, आरोग्य व हार्डवेअर इ. विभांगाकडे पाठविण्यात यावी. वार्षिक मागणी पत्रक दिलेल्या मुदतीत न पाठ्विल्यास अशा खात्यांना मध्यवर्ती भांडार कार्यालयाकडील संबंधित विभागाकडून साहित्य दिले जाणार नाही. याची प्रत्येक खात्याने नोंद घ्यावी.

( सुनिल इंदलकर )
**उप आयुक्त**
**मध्यवर्ती भांडार कार्यालय**
पुणे महानगरपालिका

**टीप** :- संबंधित विभागाचा स्टोअर लेखनिक किंवा जबाबदार व्यक्तीने समक्ष येऊन साहित्य ताब्यात घ्यावे. शिपाई, बिगारी यांचे ताब्यात साहित्य दिले जाणार नाही.

**प्रत** :- सर्व खाती व उपखाती, सर्व क्षेत्रीय कार्यालय, सर्व दवाखाने व सर्व शाळा, पुणे म.न.पा.